# शिक्षणापासून वंचितांना मुक्त विद्यापीठ आशेचा किरण

## माजी कुलगुरू रा. कृ. कंणबरकर; पदवी प्रमाणपत्रांचे वितरण

**कोल्हापूर : प्रतिनीधी**

भारतीय शिक्षण पध्दतीमध्ये महत्त्वाचे स्थान मिळविणाऱ्या मुक्त विद्यापीठांच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना शिक्षण मिळाले. शिक्षणापासून वंचित असणाऱ्यांना मुक्त विद्यापीठे आशेचा किरण ठरल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर यांनी केले.



**कोल्हापूर : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कोल्हापूर विभागीय केंद्रातर्फे आयोजित पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभात पदवी प्रमाणपत्र प्रदान करताना माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर, सोबत प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, निखिल ताम्हणकर, डॉ. के. एस. मोहिते आदी. (छाया : तय्यब अली)**

यशवंतरावचव्हाणमहाराष्ट्रमुक्त विद्यापीठाच्या कोल्हापूर विभागीय केंद्रातर्फे आयोजित पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील होते. येथील ताराराणी विद्यापीठाच्या सभागृहात हा समारंभ झाला. यावेळी २० विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरूपात प्रमाणपत्र वितरीत करण्यात आली.

कणबरकर म्हणाले, शिक्षणाने माणूस परिक्त होतो, केवळ प्रमाणपत्र मिळविले म्हणजे शिक्षित होत नाही, तर व्यक्तीच्या चेहऱ्यावर शिक्षणाचे भाव दिसले पाहिजे. व्यक्तीच्या चालण्या बोलण्यातून शिक्षणाचा प्रभाव जाणवला पाहिजे, असेही ते म्हणाले. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात शिक्षणातील बदलते प्रवाह, त्याचा आजच्या समाज व्यवस्थेतील उपयोग याचा उहापोह केला.

प्रास्ताविक विभागीय संचालक डॉ. के. एस. मोहिते यांनी केले. मुक्त विद्यापीठाच्या कोल्हापूर विभागीय केंद्रातून एकूण ३२०० विद्यार्थ्यांनी बी. ए. आणि बी कॉम पदवी संपादन केली आहे. यापैकी २० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली. प्रा. सुजय पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सहायक कुलसचिव निखिल ताम्हणकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास विभागीय कार्यालयातील कर्मचारी. विद्यार्थी, पालक, केंद्र संचालक उपस्थित होते.

# काव्य निर्मितीतून आनंद मिळावा- प्रा. कदम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

काव्यनिर्मिती करताना, उत्कट भावना नेमकेपणाने मांडत असताना, कवी कसे सांगायचे यात अडकला तर काय सांगायचे ते राहून जाते. शेवटी काव्यानिर्मितीत स्वतःला आनंद होणे महत्त्वाचे असे मत प्रा. मंदा कदम यांनी व्यक्त केले.



**कमला कॉलेजचे प्राचार्य क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते बक्षीस स्वीकारताना कवी बबलू वडर.**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कोल्हापूर विभागीय केंद्रामार्फत यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीनिमित्त कमला कॉलेज येथे काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेहोते. यावेळी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी विभागीय संचालक प्राचार्य के. एस. मोहिते होते. प्रमुख पाहुणे कमला कॉलेजचे प्राचार्य क्रांतिकुमार पाटील उपस्थित होते.

काव्यवाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक बबलू वडार, द्वितीय क्रमांक सौ. स्वप्नजा घाटगे, तृतीय क्रमांक बी. ए. नाईकनवरे यांनी पटकाविला तर श्री. राजगोंडा पाटील व सौ. अलका कारंजकर यांना उत्तेजनार्थ क्रमांक मिळाला.

सूत्रसंचालन प्रा. सुजित पाटील यांनी केले. यावेळी उपकुलसचिव निखिल ताम्हणकर, गणेश चव्हाण, प्रा. नेताजी पवार, विश्वजीत भोसले उपस्थित होते.